# प्रेसनोट दिनांक १०/०२/२०२४

## मोटार सायकल चोरीचे ०३ व घरफोडीचा ०१ असे, एकूण ०४ गुन्हे उघडकीस आणुन शहर गुन्हे शाखेची उल्लेखनिय कामगिरी.

---

सोलापूर शहरातील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत मा.श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, यांनी सूचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने, शहर गुन्हे शाखेचे पोउपनि अल्फाज शेख व पथकातील अंमलदार पोना/१३७९ बापू साठे, पोशि/१७२९ सुभाष मुंढे, पोशि/१०७५ भारत पाटील, पोशि/१७१२ सैपन सय्यद हे सोलापूर शहर व परिसरात मोटार सायकल चोरीचे गुन्हेगारांचा शोध घेत होते.

दि.०५/०२/२०२४ रोजी, बातमीदारामार्फत **पोशि/१०७५ भारत पाटील व पोशि/१७२५ सुभाष मुंढे** यांना बातमी मिळाली की, **साकीब सलीम शेख,** वय- २० वर्षे, व्यवसाय - हमाली, रा. न्यु पाच्छा पेठ, खड्डा तालीम, सोलापूर हा चोरीची मोटार सायकल घेवुन विक्रीकरिता एका ठिकाणी थांबला आहे. त्यानंतर **पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकाने,** मिळालेल्या बातमी प्रमाणे, इसम नामे - साकीब सलीम शेख यास, दि. ०५/०२/२०२४ रोजी सापळा लावुन ताब्यात घेतले.

त्यानंतर, सदर आरोपीकडे वपोनि सुनिल दोरगे यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे पथकाने कौशल्यपुर्वक तपास केला असता, नमुद आरोपीने त्याच्या ताब्यातील पॅशन प्रो मोटार सायकल नं. MH 13 BW 9891 ही, दि. २३/०१/२०२४ रोजी सोलापूर येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्स समोरुन चोरी केली असल्याचे कबुल केले. त्यामुळे, त्याचेकडे सखोल तपास केला असता, त्याने दि. २७/१२/२०२३ रोजी मार्कंडेय बगीचा, सोलापूर येथून एक एच.एफ.डिलक्स मोटार सायकल चोरुन, ती मोटार सायकल, **अमन याकूब हिरापूरे,** वय- २९ वर्षे, व्यवसाय-मोटार गॅरेज, रा. ७५२/२ ब, गोदुताई विडी घरकुल, सोलापूर यास विक्री केली असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे, त्याने, दि. २९/०१/२०२४ रोजी संमती कट्टा, सिध्देश्वर मंदीर, सोलापूर येथून एक सी.डी.डिलक्स मोटार सायकल चोरी करुन, ती मोटार सायकल ही, **फारुख ईस्माईल मकानदार**, वय- ३५ वर्षे, रा.मारुती मंदीराजवळ, इटकळ, ता.तुळजापूर, जि.धाराशिव यास विक्री केल्याचे सांगितले.

त्यानुसार, वर नमूद ०३ आरोपींना ताब्यात घेवून, त्यांच्याकडून सोलापूर शहरातून चोरी केलेल्या ७५,०००/- रूपये किंमतीच्या खालीलप्रमाणे ०३ मोटार सायकली जप्त करण्यात येवून, मोटार सायकल चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं./कलम | मो.सायकल क्रमांक | किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | जेलरोड | गुरनं. 16/2024 भादंवि 379 | पॅशन प्रो मो.सा.क्र. MH 13 BW 9891 | रु. 25,000/- |
| 2 | जेलरोड | गुरनं. 468/2023 भादंवि 379 | एच.एफ.डिलक्स मो.सा.क्र. MH 13 CV 7189 | रु. 30,000/- |
| 3 | फौजदार चावडी | गुरनं. 68/2024 भादंवि 379 | सी.डी.डिलक्स मो.सा. क्र. MH 13 AE 0252 | रु. 20,000/- |

तसेच, दि. ०५/०२/२०२४ रोजी बातमीदारामार्फत **पोना/१३७९ बापू साठे** यांना बातमी मिळाली की, सिद्दाराम परमेश्वर जिरगे, वय- ३७ वर्षे, व्यवसाय-हमाली, रा.घर नं.४०, महादेव मंदीराजवळ, मेहताब नगर, शेळगी, सोलापूर याने मार्केट यार्ड, सोलापूर येथे दिवसा घरफोडी केली असून तो सध्या महालक्ष्मी मंदीर ते मार्केट यार्डकडे जाणाऱ्या रस्त्यावर थांबला आहे. प्राप्त माहिती नुसार पोउपनि अल्फाज शेख व तपास पथकाने सदर आरोपीस ताब्यात घेवून, वपोनि श्री दोरगे सो यांचे मार्गदर्शनाखाली कौशल्यपुर्ण तपास केला असता, त्याने दि. ०४/०२/२०२४ रोजी मार्केट यार्ड येथील दुकान दुपारचे वेळी फोडून चोरी केल्याची कबुली दिली आहे. त्याच्याकडून गुन्हयात चोरी केलेले १,८०,०००/- रु. रोख रक्कमेपैकी ६०,२००/- रोख

Scanned with CamScanner

रक्कम जप्त केली आहे. सदर दिवसा घरफोडीबाबत जेलरोड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४७/२०२४ भादंवि कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा नोंद असून, सदरचा दिवसा घरफोडीचा ०१ गुन्हा उघडकीस आणला आहे.

**अशा प्रकारे, शहर गुन्हे शाखेने, मोटार सायकल चोरीचे ०३ व घरफोडी चोरीचा ०१ असे एकूण ०४ गुन्हे उघडकीस आणून, १,३५,२००/- रू किंमतीचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे.**

सदरची कामगीरी, श्री.एम.राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ. दिपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्री. सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे, सोलापूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोसई/अल्फाज शेख, पोलीस अंमलदार बापू साठे, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, सतिश काटे, अविनाश पाटील यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करीता.**

Scanned with CamScanner